## दोषारोप निश्चितीपूर्वीचा फिर्यादी यांचा शपथेवर जबाब

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – प्रविण बभ्रुवाहन ओहोळ,

वय – ५२ वर्षे, हुद्दा – जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक,

नेमणूक – सिंधुदुर्ग.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीम. एस. वाय. गोबाडे.

**०१.** सन २०१२ मध्ये जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक, सिंधुदुर्ग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३१.०५.२०१२ रोजीच्या आदेशान्वये माझी नेमणूक झाली. आता मला सदरचा आदेशाची झेरॉक्स प्रत दाखविण्यात आली. माझे उपरोक्त पद महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १३.१०.२०१० च्या राजपत्रान्वये खत निरिक्षक म्हणून घोषीत झाले. त्या राजपत्राची झेरॉक्स प्रत मी प्रकरणात दाखल केली आहे. त्यास आरोपीच्या वकीलांच्या हरकतीसह ओळखीसाठी **निशाणी क्र. ६०** देण्यात येत आहे. खत निरिक्षक या नात्याने मी जिल्ह्यातील सर्व खत विक्री केंद्रात जावून त्यांच्या खत खरेदीच्या व विक्रीच्या व्यवहारांची तपासणी करतो, तसेच खतांचे नमूने गुणवत्ता चाचणीसाठी घेऊन शासकीय खत चाचणी प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठवतो. खत अप्रमाणित घोषित झाल्यास त्या संबंधी पूढील कायदेशीर कारवाई करतो.

**०२.** आरोपी क्र. १ हे वर्धमान फर्टीलायझर ॲन्ड सीड्स या खत उत्पादक कंपनीचे जबाबदार प्रतिनिधी आहेत. आरोपी क्र. २ हे तालूका सहकारी खरेदी विक्री संघ कणकवली या खत विक्री केंद्राचे परवानाधारक व जबाबदार व्यक्ती आहेत. त्याबाबतची झेरॉक्स प्रत प्रकरणात दाखल केली आहे. माझ्या पूर्वीचे जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक, दिलीप यल्लाप्पा कांबळे यांनी तालूका सहकारी खरेदी विक्री संघ कणकवली या खत विक्री केंद्रास भेट दिली होती. त्यावेळी त्यांना १८:१८:१० या रासायनिक खताचा साठा आढळून आला. तसेच या खताच्या विक्रीचे विक्री प्रमाणपत्र आढळून आले. सदर खत त्यांनी वर्धमान फर्टीलायझर ॲन्ड सीड्स

यांचेकडून खरेदी केले होते. खरेदीबाबतचे बीलाची झेरॉक्सप्रत प्रकरणात दाखल आहे. मूळ खरेदी बील विक्रेत्याकडे आहे. कांबळे यांनी खताचे नमूने घेतले व ते प्रयोगशाळेत पाठवले होते. मी रुजू झाल्यानंतर पूणे येथील खत प्रयोगशाळेतून तपासणी अहवाल प्राप्त झाला. त्यामध्ये खत अप्रमाणित घोषीत झाले. त्यानंतर मी आरोपी क्र. १ व २ यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली, त्याची झेरॉक्सप्रत प्रकरणात दाखल केली आहे. त्यानंतर आरोपी क्र. १ व २ यांनी पाठविलेल्या उत्तरामध्ये त्यांनी खत चाचणी प्रयोगशाळा पूणे यांचा अहवाल नामंजूर असल्याचे कळविले. आरोपी क्र. १ व २ यांनी खताच्या पूर्नविश्लेषणाची मागणी केली नाही. त्यामुळे सदर आरोपीं विरुध्द खटला दाखल करण्यासाठी मी सर्व कागदपत्रे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे सादर केले व त्यांचेकडून खटला दाखल करण्यासाठी लेखी परवानगी घेतली. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सिंधुदुर्ग यांचे कडील परवानगीची मूळ प्रत प्रकरणात दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ६१** देण्यात येत आहे. सदर आदेशान्वये मी तालूका न्यायदंडाधिकारी कणकवली येथे आरोपीं विरुध्द खटला दाखल केला. आता मला निशाणी क्र. १ वरील तक्रार दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो, आरोपी क्र. २ आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

आरोपीं तर्फे उलटतपास तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

(श्रीम. व्ही. आर. जांभुळे.)

दिनांकः २५.१०.२०२४.

मुख्य न्यायदंडाधिकारी,

सिंधुदुर्ग – ओरोस.